# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यातील सहाय्यक शिक्षक परीविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(१) ३२२२३ (११-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करून सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२२-०२-२०२३) :**(१) सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करुन सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याबाबतची बाब शासनस्तरावर विचाराधीन नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील शिक्षकांना निवडणूक व जनगणना व्यतिरिक्त इतर कामे दिल्याबाबत

**(२) ४०७४९ (३१-०३-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शा.नि.क्र.पी.आर.ई. २००८/२५२/२००८ प्रा.शि.१, मंत्रालय, मुंबई, दिनांक १ ऑगस्ट, २००८ अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील शिक्षकांना निवडणूक व जनगणने व्यतिरिक्त अन्य कोणतीही अशैक्षणिक कामे देऊ नये असे सांगण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत शासन निर्णयास अनुसरुन शिक्षकांना अन्य कामे दिली जात असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२२-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासन परिपत्रक दिनांक १८.०६.२०१० अन्वये शाळेत पदस्थापित केलेला कोणताही शिक्षक इतर कोणत्याही शाळ/कार्यालयात काम देण्यात येणार नाही तसेच त्यास दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाचे काम किंवा स्थानिक प्राधिकरण, राज्य विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या कर्तव्याखेरीज इतर कोणतेही शिक्षणेत्तर काम देण्यात येणार नाही, असे आदेश दिले आहेत.

तसेच शासन परिपत्रक दिनांक ०३.०५.२०१३ नुसार शाळाबाह्य कामाकरीता शिक्षकांच्या सेवा वापरण्यात येऊ नये व इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीने किंवा तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या सेवा रद्द करुन नियुक्तीच्या शाळेवर वर्ग करण्यात याव्यात, असे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत.

ग्राम विकास विभागाने दिनांक १६.०८.२०१७ च्या पत्रान्वये शिक्षकांनी शिक्षणाच्या कामाशिवाय अन्य काम करुन नये व प्रशासनाने म्हणजेच जिल्हा परिषदांनी त्यांचा उपयोग शिक्षणाशिवाय अन्य कामासाठी करुन नये, असे निर्देश दिले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत कोव्हीड १९ मुळे उद्भवलेल्या संवर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण याकरीता शिक्षकांच्या सेवा कोरोना योध्दा म्हणून घेण्यात आल्या होत्या. परंतु सदरची साथ नियंत्रणात आल्यानंतर व शासनाच्या निर्देशानुसार शाळा सुरु झाल्यामुळे शिक्षकांना सदरच्या सेवेतून कार्यमुक्त केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यातील बिरमणी हातलोट मार्गे (ता.दापोली जि.रत्नागिरी) सातारा जिल्हयाला जोडणा-या रस्त्यांचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३) ४५८४१ (२५-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील बिरमणी हातलोट मार्गे (ता.दापोली जि.रत्नागिरी) सातारा जिल्हयाला जोडणा-या रस्त्यांचे काम मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, यांच्यांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर रस्ते बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तावित रस्त्याकरिता आवश्यक परवानग्या प्राप्त करणे व भुसंपादनाची प्रक्रीया करणे याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्याची प्रक्रीया प्रगतीत आहे. प्रस्तावित रस्त्याच्या आखणीची सुसाह्यता तपासून निधी निकष व प्राथम्य क्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात एकूण २११ गैरकारभाराच्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आल्याबाबत

**(४) ४५८७३ (२५-१०-२०२२). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी ते १२ एप्रिल पर्यंत पहिल्या तीन महिन्यांमध्ये एकूण २११ गैरकारभाराच्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून त्यात खासगी ४२ व्यक्तिंसह २८८ सरकारी विभागातील व्यक्तींवर आरोप करण्यात आल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) तर्फे सांगण्यात आल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महसूल व भूमी अभिलेख विभाग ५० प्रकरणांसह अव्वल तर पोलीस विभाग ३७ प्रकरणांसह दुसरा व पंचायत समिती २४ प्रकरणांसह तिसऱ्या क्रमांकावर असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

i. दिनांक ०१.०१.२०२२ ते दिनांक १२.०४.२०२२ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत एकूण २११ सापळा कारवाई करण्यात आलेल्या आहेत. सदर कारवाईमध्ये ४२ खाजगी इसमासह एकूण २८८ शासकीय कर्मचारी यांचा समावेश आहे.

ii. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडील अभिलेखानुसार महसूल व भुमी अभिलेख विभाग यांचे ५० प्रकरणे, पोलीस विभाग ३७ प्रकरणे व पंचायत समिती २४ प्रकरणे आहेत.

iii. शासन स्तरावर देखील प्रत्येक प्रशासकीय विभागांच्या सचिवांच्या अध्यक्षतेखालील निलंबन आढावा बैठकीत तसेच मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील आयोजित आढावा बैठकीमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत दोषी आढळलेल्या लोकसेवकांना सेवेतून निलंबित करण्याबाबतचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना दिल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील शालेय पोषण आहार योजना बंद असल्याबाबत

**(५) ४९५८६ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात शालेय पोषण आहार ही योजना बंद करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयात पोषण आहार तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना फक्त रु.पंधराशे मानधन देण्यात येते तसेच इतर राज्यात कर्मचाऱ्यांना दहा ते चौदा हजार रुपये मानधन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर योजना सुरु ठेवण्याबाबत व पोषण आहार कर्मचाऱ्यांना वाढीव मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (११-०४-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रस्तुत योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना वर्षातील १० महिन्यांकरीता प्रति माह रु.१५००/- इतके मानधन अदा करण्यात येत होते. तथापि, सदर मानधनामध्ये रु.१०००/- इतकी वाढ करुन माहे एप्रिल, २०२३ पासून प्रति माह रु.२५००/- इतके मानधन अदा करण्याचा निर्णय दि.०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मोबाईलवर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाईन गेमवर बंदी आणण्याबाबत

**(६) ५१०६८ (१७-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोबाईलवर ऑनलाईन खेळणाऱ्या रमी, सापसिडी, लुडो यासह अनेक गेममुळे तरुण तसेच लहान मुले व्यसनाधीन बनत चालली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गेममुळे व्यसनाधीन होऊन अनेक लहान मुलांनी प्राणही गमावले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तामिळनाडू शासनाच्या धर्तीवर अध्यादेश काढून ऑनलाईन गेमवर बंदी आणण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

कोरोना महामारीच्या कालावधीत संपूर्ण देशात टाळेबंदी (लॉकडाउन) असल्याने, मोठ्या प्रमाणावर मुले ऑनलाईन गेम, सापसिडी, लुडो, रमी, तीन पत्ती, प्रोबो ऑनलाईन ॲप, ऑनलाईन जुगार, फ्री फायर, क्लॅश रॉयल, क्लॅश क्लॅन, असफाल्ट, रेसिंग, माईन क्राफ्ट अशा ऑनलाईन गेमकडे आकर्षित झाली होती. ऑनलाईन गेम मधून देण्यात येणाऱ्या आकर्षक बक्षीसांमुळे मुलांमध्ये उत्सुकता निर्माण होऊन ऑनलाईन गेम खेळण्याचे प्रमाण वाढले.
(२) नाही, हे खरे नाही.

परंतु, मानपाडा पोलीस ठाणे येथे ऑनलाईन रमी गेम मध्ये पैसे हरल्याने एका व्यक्तीने आत्महत्या केल्याबाबत अकस्मात मृत्यू रजि. नं. २९/२३, भा. दं. वि. कलम १७४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त आत्महत्येचे कोणतेही प्रकरण अद्याप निदर्शनास आलेले नाही.
(३) राज्यात ऑनलाईन गेमवर प्रतिबंध घालण्याकरीता अस्तित्वातील कायद्यात कोणतीही तरतूद नाही. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ मधील तरतुदी ऑनलाईन गेमवरती नियंत्रण ठेवण्यास असमर्थ ठरत असल्याची बाब विचारात घेऊन महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायदा अंतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील सिल्लोड येथे स्टार्च उद्योग सुरु करण्याबाबत**

**(७) ५१७२० (१९-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील सिल्लोड येथे स्टार्च उद्योग सुरु करण्याची घोषणा शासनामार्फत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने स्टार्च उद्योग सूरु करण्यासंदर्भात तसेच उद्योगाच्या पुनरुज्जीवनासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०५-२०२३) :** (१) नाही.
(२) सन २०२२-२३ च्या औरंगाबाद जिल्हयाच्या तालुका निहाय पेरणी अहवालानुसार सिल्लोड तालुक्यात ८,९८७ हेक्टर क्षेत्रावर रब्बी मक्याची प्रत्यक्ष पेरणी झाली आहे.

जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांचेकडून मकावर आधारित स्टार्च उद्योगासाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत प्रोत्साहने दिली जातात. तसेच स्टार्च उद्योग हा कृषिपूरक प्रक्रिया उद्योग असल्याने सदर उद्योगासाठी विशेष प्रोत्साहने लागू आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

---

## निवळी- पाचांबे- नेरद मार्गे पाटण मळे घाटरस्ता व देवरुख - हरपुडे कुंडी- बेलारी ते जिल्हा हद्द घाट (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) रस्त्याचे काम पुर्ण करणेबाबत

**(८) ५३७६२ (१८-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवळी, पाचांबे, नेरद मार्गे पाटण मळे घाटरस्ता व देवरुख हरपुडे कुंडी बेलारी ते जिल्हा हद्द घाट रस्ता या दोन्ही घाटरस्त्याच्या सर्वेक्षणासाठी माहे मार्च २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रत्येकी रु.५ कोटी निधीची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मळेघाट निवळी नेरद मार्गे पाटण घाट रस्ता व हरपुडे- कुंडी घाट रस्त्याचे काम काही तांत्रिक अडचणी व निधीची न झालेली तरतुद यामुळे बंद पडले होते, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या रस्त्यामुळे सातारा जिल्हातील व पाटण तालुक्यातील गावांचा दळणवळणाची समस्या दूर होऊन कोकणातून मळे घाट ते मुंबई पुणे जाण्यास पर्यायी मार्ग मिळेल तसेच घाट व कोकण एकमेकाला जोडले जावून औद्योगिक क्रांती होऊन फलोत्पादनास व पर्यटनस्थळांना चालना मिळून रोजगार उपलब्ध होईल, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही घाट रस्त्यांचे काम पुर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०५-२०२३) :** (१) सदर दोन घाट मार्ग यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्रत्येकी रु. ५.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर घाट रस्त्याचे सविस्तर सर्वेक्षण, भूसंपादन व वनविभागाच्या सविस्तर परवानगी घेणे या मंजूर कामाचे अंदाजपत्रक व निविदा प्रक्रिया पुर्ण करुन काम कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संभाजीनगर (औरंगाबाद) येथील हर्सूल रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(९) ५४८१३ (१८-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संभाजीनगर (औरंगाबाद) येथील हर्सूल रस्ता रुंदीकरणात येणा-या ९८ मालमत्तांचा मोबदला देण्यासाठी १९ कोटी २१ लाख रुपयांचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (न्हाई) विभागाला जिल्हाधिकारी कार्यालयाने माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असल्याने रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अपुर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई - नागपूर समृध्दी महामार्ग औरंगाबाद शहर परिसरातून हर्सूल गावातील मंजूर ५०० मीटर जळगांव मुख्य रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याने सदर रस्ता अतिक्रमण मुक्त करण्याची मागणी दि.२८.९.२०२२ रोजी व त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रश्न भाग १ मधील प्रस्ताव मंजूर करुन रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पुर्ण होणे तसेच प्रश्न भाग २ मधील जळगांव मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**(१) होय.

(२) होय.

(३) बाधित मालमत्ताधारकांना नुकसान भरपाई वाटप करण्यात आले असुन, वारस हक्क, तक्रार इ.प्रकरणी प्रकरण परतवे मा. न्यायालयाचे सक्षम अधिका-यांचे निर्णय झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी कळविले आहे.

संपादीत मालमत्ता दिनांक १४.०२.२०२३ रोजी महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन व संपादन संस्था यांच्या समन्वयाने ताब्यात घेऊन मालमत्ता पाडुन रस्ता रुंदीकरणाचे काम प्रगतीत आहे.

मौजे हर्सुल गावातील रहदारीला बाधित ठरणारे अडथळे तातडीने काढण्यात यावे अशा स्वरुपाची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे केली होती. त्याअनुषंगाने निवाडा मंजुरीनंतर संपादीत मालमत्ता ताब्यात घेऊन मालमत्तांचे पाडकाम पुर्ण केले असुन, रस्ताबांधणीचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परदेशी विद्यापीठांना देशात येण्यास परवानगी देण्याबाबत

**(१०) ५६५१५ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परदेशी विद्यापीठांना देशात येण्यास परवानगी देण्याबाबत नियमावलीचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नुकताच जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परदेशी विद्यापीठांना मान्यता दिल्यास देशातील उच्च शिक्षण आणि उच्च शिक्षण संस्थांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परदेशातील विद्यापीठांना भारतात ज्या सुविधा दिल्या जाणार आहेत त्या सुविधा देशातील आघाडीच्या विद्यापीठांनाही देण्यात याव्यात अशी मागणी पुणे विद्यापीठाच्या माजी कुलगुरुंनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे;

(२) व (३) हे खरे नाही;

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटात अवघड वळणांवर प्रीकास्ट ‘H’, ‘Y’ ब्लॉक विथ रोप या पद्धतीचा वापर करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याने एक मॉडेल बनविले असल्याबाबत

**(११) ५६५९१ (२४-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याने घाटात अवघड वळणांवरील दरींमध्ये होणाऱ्या अपघातास आळा बसण्यासाठी प्रीकास्ट ‘H’, ‘Y’ ब्लॉक विथ रोप या पद्धतीचा वापर करून एक मॉडेल बनविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मॉडेल बाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चाचणी घेऊन संपूर्ण राज्यात ते उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) लॅन्ड स्लाईड रिटेनिंग वॉल प्रिकास्ट H व Y ब्लॉक क्रॅश बॅरीयर मॉडेल प्रणाली पोलादपूर महाबळेश्वर वाई

सुरुर रस्ता रामा १३९ वर सा.क्र. कि.मी. २०/४०० येथे प्रायोगिक तत्वावर बसविण्यात आले आहे. निरीक्षणाअंती आवश्यक चाचण्या पुर्ण करुन प्राप्त निर्ष्कषाच्या आधारे उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार पूर्व (ता. वसई, जि.पालघर) येथील शास्त्री विद्यालय या खाजगी अनुदानित शाळेच्या व्यवस्थापक मंडळाकडून शालेय पोषण आहारात झालेल्या अनियमिततेबाबत**

**(१२) ५६७५३ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार पूर्व (ता. वसई, जि.पालघर) येथील शास्त्री विद्यालय या खाजगी अनुदानित शाळेतील शालेय पोषण आहाराचे धान्य मोठ्या प्रमाणात काळ्या बाजारात विकले जात असल्याचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री,शालेय शिक्षण मंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री,जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी तत्कालीन शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी दिनांक २८ जुलै २०२१ रोजी वा त्या सुमारास अपर मुख्य सचिव शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी कार्यकारी अधिकारी, पालघर यांना दिले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२९-०५-२०२३) :** (१) अंशत: हे खरे आहे.
दि.१४ फेब्रुवारी, २०२० रोजी तत्कालिन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच, दि.२० फेब्रुवारी, २०२० रोजी तत्कालिन मंत्री, शालेय शिक्षण यांना जिल्हाध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष, पालघर यांनी प्रस्तुत विषयाबाबतचे निवेदन दिले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
दि.३१ ऑगस्ट, २०२० रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर जिल्हा यांनी प्रस्तुत प्रकरणाबाबत उचित कार्यवाहीचे निर्देश दिले होते.
(४) सदर प्रकरणी विरार पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.१५४/२०२०, भा.द.वि.क ४०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांची प्रस्तुत प्रकरणाबाबत चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागातील कामांचे वाद विविध लवाद तसेच न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ५६८७३ (२४-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे रुपये ३५ हजार कोटी तर जलसंपदा विभागाच्या रुपये ४५ ते ५० हजार कोटींच्या कामाचे वाद विविध लवाद तसेच न्यायालयात प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीच्या निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या तसेच ठेकेदारांना साहाय्यभूत ठरणाऱ्या अटीशर्ती ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांची शासन चौकशी करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली व यात दोषी आढळलेल्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील विविध प्रकल्पामध्ये कंत्राटदार/उद्योजक यांच्या दाव्यांबाबत लवाद तसेच न्यायालयीन याचिका प्रगतीत आहेत. यानुषंगाने सदर दाव्यांच्या रक्कमा विवादित (disputed) आहेत.
(२) व (३) विविध कामांकरिता निविदा प्रचलित शासन निर्णय/परिपत्रके/अधिनियम यामधील अटी व शर्तीनुसार तयार करण्यात आले आहेत. तथापि सा.बां, प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अधिनस्त एका खाजगीकरणांतर्गत प्रकल्पामध्ये जाचक निविदा अटी व शर्ती सवलत करारनाम्यात समाविष्ट केल्याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त होताच अहवालातील निष्कर्षाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोर (जि.पुणे) ते महाड (जि.रायगड) रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत

**(१४) ५६९०५ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) ते महाड (जि.रायगड) या सतत रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्ता नादुरुस्त झाल्याने अपघात आणि वाहने बंद पडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी साधारण किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करणे व प्रत्यक्ष कामास सुरुवात होऊन दुरुस्ती पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(४) असल्यास, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) (३) व (४)
सदर लांबीतील महामार्गाचे काम हे इ.पी.सी. करारानुसार प्रगतीत असल्याने, करारनाम्यानुसार सदर लांबीतील देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ही संबंधित कामाच्या ठेकेदाराची आहे. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा असून हे काम डिसेंबर २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## येवला (जि.नाशिक) येथील शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

**(१५) ५७१०७ (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथील शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावाला मान्यता देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) येवला (जि. नाशिक) येथील शासकीय विश्रामगृहाच्या विस्तारीकरणाचे कामाबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील जे.जे.स्कुल ऑफ आर्टस् या महाविद्यालयात शिक्षक भरती करुन इमारतीचे नुतनीकरण करणेबाबत**

**(१६) ५७११३ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जे.जे. स्कुल ऑफ आर्टस् या महाविद्यालयात अनेक शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याने विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नसणे, विद्यार्थ्यांना मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याकडे शासनाकडून दुर्लक्ष झाल्यामुळे विद्यार्थ्यांवर परिणाम होत असल्याने या विरोधात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा सुमारास त्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महाविद्यालयाची इमारत १५० वर्षाहून अधिक जुनी व जीर्ण झाल्याने अनेक ठिकाणी स्लॅब कोसळून गळती समस्यामुळे इमारत धोकादायक स्थितीत असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण होणे, सदरहू इमारतीचे दुरुस्ती काम करण्यासाठी राज्य शासनाने निधी मंजूर करुनही अद्याप सदरहू इमारतीचे दुरुस्ती काम सुरु होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात विद्यार्थ्यांच्या संघटनेतर्फे मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदन देऊनही याबाबत अद्यापपावेतो शासनाकडून कोणतीच कार्यवाही न झाल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महाविद्यालयातील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (३०-०५-२०२३) :** (१) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई येथील विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध समस्यांसंदर्भात माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये आंदोलन सुरु केले होते.
(२) व (३) अंशत: खरे आहे. सर ज.जी. कला शाळा आवारातील मुख्य इमारतीचा जीर्णोध्दार करण्यास शासन निर्णय दि. ९ जानेवारी, २०२३ अन्वये रु. १०,४९,८५,२०२/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन जीर्णोध्दाराचे काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रीयेबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील ४ शासकीय कला महाविद्यालयांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०८/०७/२०२० अन्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परीषदेच्या निकषानुसार १५९ अध्यापकीय पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत. यापैकी १५० अध्यापकीय पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दि. ३१ मार्च, २०२३ रोजी मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तासिका तत्त्वावर, हंगामी व कंत्राटी स्वरुपात एकूण ६३ अध्यापक नियुक्त करुन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे सुरु ठेवण्यात आले आहे.
(५) लागू नाही.

---

## माणगांव (जि.रायगड) बाह्य रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) ५७४५१ (२५-०४-२०२३).** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील माणगांव (जि.रायगड) शहरातील बाह्यरस्त्याचे काम प्रलंबित असल्यामुळे माणगांव शहरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बाह्यवळण रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**(१) हे अशंत: खरे आहे.

सदर बाहय वळण मार्गाच्या चौपदरीकरणासाठी आवश्यक जमिनीच्या भूसंपादन मोबदला वाटपामधील अडथळयांमुळे व सदर जमिनीवर असलेल्या वनजमिनीवर काम करण्यासाठी आवश्यक वन विभागाच्या परवानगीसाठी वेळ लागल्याने सदर लांबीतील काम हे प्रलंबीत होते.

(२) केंद्र व राज्य शासनातर्फे मुंबई गोवा महामार्गाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने वारंवार बैठका घेण्यात येवून कामातील अडचणी दुर करण्यात आलेल्या आहेत.

सदयस्थितीत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली (MoRT&H) यांचे मार्फत प्रलंबीत भूसंपादन मोबदला रक्कम मंजूर करण्यात आली असून भूसंपादन मोबदला रक्कम वाटपाची प्रक्रिया जानेवारी २०२२ पासून केंद्र सरकारच्या भूमीराशी पोर्टल मार्फत प्रगतीत आहे.

वनजमिनीमध्ये काम करण्यासाठी वनविभागामार्फत Stage-I व Stage-II ची मंजूरी प्राप्त झाली असून, काम करण्यासाठीची परवानगी दि.१४.११.२०२२ रोजी मिळाल्याने वनजमिनीतील रखडलेले काम वेगाने पूर्ण करता येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सर जे.जे कला महाविद्यालयासह उपयोजित कला व वास्तुकला महाविद्यालयाला अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याबाबत

**(१८) ५७९८९ (२४-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर जे.जे कला महाविद्यालयासह उपयोजित कला व वास्तुकला महाविद्यालयास अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्यासंदर्भात माजी विद्यार्थ्यांनी व विद्यार्थी संघटनांनी सन २०१७ पासून शासनाकडे वारंवार मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयोगाने सदरच्या संस्थेला अनन्य स्वायत्त दर्जासह (डी.नोव्हे) अभिमत विद्यापीठ सुरु करण्यास दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास इरादा पत्र (Letter of Intent)दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयोगाने इरादापत्र देवूनही अद्याप अभिमत विद्यापीठ सुरु करण्यात आले नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अभिमत विद्यापीठ सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (३०-०५-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
सर ज. जी. कला महाविद्यालयासह उपयोजित कला व वास्तुकला महाविद्यालयास अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्यासंदर्भात कला संचालनालयामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडे दि. १९/०३/२०२० रोजी ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यात आला होता.
(२) होय.
(३) व (४) केंद्र शासनाने दिलेल्या इरादापत्रातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यासाठी टास्क फोर्स समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीचा अंतीम अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने डि-नोव्हो विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड व रत्नागिरी जिल्हयांना जोडणाऱ्या आंबेत खाडीवरील पुलाच्या पुर्नबांधणीबाबत**

**(१९) ५८०१८ (२५-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड व रत्नागिरी जिल्हयांना जोडणारा आंबेत खाडीवरील पुल नादुरुस्त असल्याने मागील अनेक वर्षे वाहतूकीकरिता बंद असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूलाची तात्काळ पुर्नबांधणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे सातत्याने मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पुलाच्या पुर्नबांधणीकरिता निधीची तरतुद करण्यात आली आहे काय, असल्यास, किती रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०५-२०२३) :** (१) सदरच्या पुलावरील दि. ०७/१०/२०१९ ते दि.१०/०२/२०२१ या कालावधीत पुलाच्या दुरुस्तीच्या कामासाठी अवजड वाहतुक बंद करण्यात आली होती.
सदर पुलावरील सर्व प्रकारची वाहतुक दि.१०/०२/२०२१ ते दि.२८/०६/२०२१ या कालावधीत पुलाचे बेअरिंग बदलणे व पेडस्टलची दुरुस्ती करण्यासाठी पुलाचा स्लॅब गर्डरसहीत उचलावा लागणार असल्याने बंद करण्यात आली होती. या कालावधीमध्ये फेरीबोट सेवा सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती.
पुलाचा एक पिअर प्रवाहाच्या खालील बाजूस अंशत: झुकल्याचे जानेवारी,२०२२ मध्ये निर्देशनास आले. पुल वाहतुकीस धोकादायक झाल्याने दि.०८/०२/२०२२ पासून पूल वाहतुकीसाठी पुर्णत: बंद करण्यात आला. पुलावरील वाहतुक बंद असल्याने प्रवाशांची गैरसोय होवू नये म्हणून दि.१२/०३/२०२२ पासून सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निशूल्क फेरी बोट सेवा सुरु करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर पुलाच्या दुरस्तीकरीता रक्कम रु.२०.२६ कोटीचे मंजूर काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे.
सदर पुलाच्या पुर्नबांधणीचे काम निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३ (FDR) अंतर्गत धाराशीव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळणे बाबत

**(२०) ५८०७६ (२५-०४-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३ (FDR) अंतर्गत धाराशीव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील रुपये ७०४८ लाख इतक्या रक्कमेच्या रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळणे बाबत दि.१८.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशीव (उस्मानाबाद) जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसाने रस्त्यांची व पुलांची मोठ्या प्रमाणात हानी होऊन रस्ते व पुले क्षतीग्रस्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्षतीग्रस्त झालेल्या रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्याकरिता धाराशीव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी शासनाकडुन प्राप्त निर्देशानुसार कामे हाती घेऊन तात्पुरत्या स्वरूपात रस्ते व पुले पूर्ववत करून वाहतुकीकरिता सुस्थितीत करून दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ते व पुलांची कायम स्वरुपी दुरूस्ती करण्याकरिता आवश्यक निधीची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०५-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर रस्त्यावर सन २०२२-२३ च्या वार्षिक दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत देखभाल दुरुस्तीची कामे वेळोवेळी करुन सद्यस्थितीत रस्ते वाहतुकीकरीता सुस्थितीत आहेत.

वार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत जिल्ह्याकरीता एकूण रु.२७.५२ कोटीचा कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे. सदर कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे लवकरच कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर कायमस्वरुपी दुरुस्तीची कामे निधी, निकर्ष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहरात रास्त भाव दुकानातून धान्य गहाळ झाल्याबाबत

**(२१) ५८३३७ (२४-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहरात रास्त भाव दुकानातून धान्य गहाळ झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घुग्घुस (जि.चंद्रपूर) शहरातील शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळत नसल्याबाबत**

**(२२) ५८३३८ (२४-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) शहरातील शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली तसेच यात दोषी असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील मौजे बहिरवली (ता.खेड) ते मौजे करंबवणे (ता.चिपळूण) खाडीपुलाच्या कामाबाबत**

**(२३) ५८३५० (२५-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे बहिरवली (ता. खेड) ते मौजे करंबवणे (ता. चिपळूण) दरम्यान दोन तालुक्यांना जोडणाऱ्या खाडीपुलाच्या कामाला सन २०१७-२०१८ मध्ये मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे काम सुरु झाले आहे काय व कामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामाकरीता तज्ञ सल्लागाराची नियुक्ती दि.०६/०२/२०२३ रोजी करण्यात आली आहे आवश्यक परवानग्या प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) निरंक

---

## रत्नागिरी जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या रस्त्यांसाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(२४) ५८३६३ (२५-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खरवते-ओमळी-ताम्हणमळा रस्ता (प्रजिमा ४९), रामपूर-पाथर्डी-मिरवणे-ओमळी-ढोक्रवली ते रा.मा. क्र. १६३ ला जोडणारा रस्ता (इजिमा क्र.१४७), मिरवणे ते गुढे रस्ता इजिमा क्र. ५० व गुढे मोरेवाडी ते कुटगिरी पातीवाडी रस्ता (ग्रामा १६६), निर्व्हाळ ते खरवते रस्ता ग्रामा ८ व तांबी तांबडवाडी रस्ता (ग्रामा क्र. ३८), तसेच गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मासु आवरे-असोरे-कोळवली-भातगाव-राई पूल रा.मा. क्र. १७४ ला मिळणारा रस्ता (इजिमा १५८.) या जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्त्यांना दर्जोन्नती मिळून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने या रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०५-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) कामांचे प्राधान्यक्रम, निधीची उपलब्धता व निकषांच्या अधिन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

## मौजे कामथे खुर्द (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील डोंगरांचे खोदकाम केल्यामुळे परिसरातील घरांना निर्माण झालेला धोका

**(२५) ५८५८० (२५-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या रुंदीकरणाचे कामा करताना मौजे कामथे खुर्द (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील डोंगरांचे खोदकाम केल्यामुळे १३ घरांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक १८ जुलै, २०१९ रोजीपासून सातत्याने मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कुटुंबांचे पुनर्वसन करणे तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै २०१९ मध्ये पावसाळयात सदर ठिकाणी घरांना धोका असल्याबाबत महामार्ग विभागाकडे संपर्क केला होता. त्यावेळी डोंगराकडील बाजूस संरक्षक भिंत बांधून दरडीचे संरक्षण करण्यात आलेले आहे व जुलै २०१९ पासून अद्यापपावेतो मागील ३ पावसाळयामध्ये सदर घरांना महामार्गाच्या डोंगर कटींग कामामुळे धोका उद्धवलेला नाही. तसेच महामार्ग भूसंपादन कायदा १९५६ मध्ये संपादीत क्षेत्राबाहेरील बांधकामाचे/स्थानिकांचे पुनर्वसन करण्याची तरतूद नाही.

---

## दळवेल (तालुका पारोळा, जिल्हा जळगाव) येथील २७ घरे भूसंपादन व इतर प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच पाडण्यात आल्याबाबत

**(२६) ५८५८९ (२५-०४-२०२३). :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव व धुळे जिल्ह्याला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी दळवेल (ता.पारोळा, जि.जळगाव) येथील २७ घरे भूसंपादन व इतर प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच पाडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन स्तरावरून सदर मालमत्ता धारकांची मालकी, मोजणी मोबदला, मूल्यांकन व इतर बाबी निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु असताना अचानकपणे ही कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मालमत्ता धारकांना शासनाने नुकसान भरपाई दिली आहे काय तसेच अचानक पणे कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही

(३) जळगाव व धुळे जिल्ह्याला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,जळगांव यांनी कळविल्यानुसार भुसंपादन प्रस्तावित जमिनीची मोजणी दि.१६.०१.२०१२ अन्वये केलेली होती. त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही भुसंपादन निवाडा दि.२३.०१.२०१५ व दि.१०.०१.२०२० नुसार पुर्ण करण्यात आली होती. सदर गावठाणातील जागेवर दि. ०९.०१.२०१६ पर्यंत कोणतेही बांधकाम नव्हते. तद्नंतर २०१६ ते २०१७ चे कालावधीत गावठाणातील जागेवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले असल्याने नुकसान भरपाई देय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जे.जे.कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले आंदोलन

**(२७) ५८६०६ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे.कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी न्याय मागण्यांसाठी मोकळ्या मैदानात शाळा भरवून माहे नोव्हेंबर, डिसेंबर,२०२२ व जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (३०-०५-२०२३) :** (१) सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई येथील विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध समस्यांसंदर्भात माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये आंदोलन सुरु केले होते.

(२) विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

१) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई व सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई येथील रिक्त अध्यापकीय पदे भरणे,

२) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई व सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई येथील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था करणे,

३) डि-नोव्हो विद्यापीठाबाबत विद्यार्थ्यांमध्ये असणारा संभ्रम दूर करणे,

४) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई येथील फाऊंड्रीची दुरुस्ती करणे,
५) सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये सर ज.जी.कला महाविद्यालयातील काही अभ्यासक्रमासाठी जागा उपलब्ध करणे व
६) संगणक व आज्ञावली (सॉफ्टवेअर) खरेदी करणे.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील चार शासकीय कला महाविद्यालयातील १५० रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. दरम्यान विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई व सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई येथे एकूण ६३ तासिका/हंगामी/ कंत्राटी स्वरुपात अध्यापकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२) तेलंग मुलींचे वसतिगृह, मुंबई येथे ३० विद्यार्थीनींच्या व मातोश्री मुलांचे वसतिगृह येथे २५ विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, प्रवेशित अभ्यासक्रमाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांना वसतिगृहात दिलेला प्रवेश पुढे चालू ठेवण्याबाबतची विनंती संबंधितांना करण्यात आली आहे.

३) डि-नोव्हो विद्यापीठ स्थापन करण्यासाठी गठित टास्क फोर्स समितीचे अध्यक्ष यांनी दि. १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी विद्यार्थी प्रतिनिधी समवेत चर्चा करुन विद्यार्थ्यांचे शंका निरसन केले आहे.

४) सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई येथील फाऊंड्रीच्या नूतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मार्च, २०२३ अखेर पूर्ण करण्यात आले असून सदर फाऊंड्रीमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज सुरु करण्यात आले आहे.

५) सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई येथील रे-आर्ट वर्कशॉप नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले असल्याने तसेच सर ज.जी. कला शाळा आवारातील डीन बंगल्यामध्ये विद्यार्थ्यांचे वर्ग सरु करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या बैठक व्यव्यस्थेची अडचण दूर झाली आहे.

६) सर ज.जी. कला महाविद्यालय व सर ज.जी उपयोजित कला महाविद्यालय या दोन्ही महाविद्यालयांना एकूण ३३ संगणक व ७४ ॲडॉब सॉफ्टवेअरचे वाटप दि. १७ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे उमरखेड खंड -१ ( जि.यवतमाळ) शेत स.नं.२६/१, क्षेत्र २.०० हे.आर. हया जमिनीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन होण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबत**

**(२८) ५८७७० (०३-०५-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरखेड खंड -१ ( जि.यवतमाळ) शेत स.नं.२६/१, क्षेत्र २.०० हे.आर. हया जमिनीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन होण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबत दिनांक २५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :**(१) होय. हे खरे आहे.

मा.श्री.नामदेव ससाणे, विधानसभा सदस्य यांनी मौजे उमरखेड खंड-१ (जि.यवतमाळ) शेत स.नं. २६/१, क्षेत्र २.०० हे.आर. ह्या जमिनीवर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन होण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबत दिनांक २५ डिसेंबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे.

(२) सदर निवेदनाचे अनुषंगाने नगर विकास विभागास अभिप्राय देण्याची विनंती दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १६७ (17)

## मुंबई येथे विश्व मराठी संमेलन आयोजित करण्याबाबत

**(२९) ५९०३७ (२४-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेचा जगभर प्रचार, प्रसार होण्यासाठी व मराठी साहित्य, कला व संस्कृती यांना उजाळा देण्यासाठी मराठी भाषा विभागाने दिनांक ४ ते ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मुंबई येथे विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संमेलनात कोणकोणते कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) तसेच, संमेलनासाठी एकुण किती खर्चाची तरतूद करण्यात आली व त्यापैकी किती रक्कम प्रत्यक्षात खर्च झाली आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे, मराठी विश्व संमेलन मुंबईमध्ये दिनांक ४, ५, ६ जानेवारी, २०२३ मध्ये आयोजित करण्यात आले होते.

२) दिनांक ४ जानेवारी,२०२३ चे कार्यक्रम

उद्घाटन सोहळा

मराठी अभिमान गीत व गीत गायन

परिसंवाद- मराठी भाषा : काल,आज,उद्या

१० विविध क्षेत्रातील नामवंत महिलांचा मराठमोळा फॅशन शो

लोकसंगीत

चहा हसूया

दिनांक ५ जानेवारी,२०२३ चे कार्यक्रम

स्वर अमृतांचा

मराठी पाऊल पडते पुढे (परिसंवाद)

आकाशझेप

विचार : साहित्य आणि संस्कृती

वाद्य महोत्सव- महाताल

महाराष्ट्राची हास्यजत्रा

वाद्य जुगलबंदी

महासंस्कृती लोकोत्सव

दिनांक ६ जानेवारी,२०२३ चे कार्यक्रम

दिंडी

मराठी खाद्यसंस्कृती

इन्व्हेस्टर मीट

आनंदयात्री (कविता वाचन,अभिवाचन व गाण्यांचा कार्यक्रम)

गप्पाष्टक (मुलाखतीचा कार्यक्रम)

अप्सरा आली

मराठी बाणा

(३) जगातील अनेक देशातील मराठी भाषिकांसाठी उपक्रम राबविण्याची तरतूद विभागाच्या अधिनस्त असलेल्या राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेमध्ये आहे. संस्थेच्या लेखाशीर्षाखाली सन २०२२-२३ करिता मंजूर अनुदानातून विश्व संमेलनासाठी अंदाजे रुपये रु.१०,००,००,०००/- (दहा कोटी फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. त्यापैकी कार्यक्रमावर एकूण खर्च रु.९,३०,८७,३१७/- (नऊ कोटी तीस लक्ष सत्याऐंशी हजार तीनशे सतरा फक्त) इतका खर्च झाला असून शासनाकडून त्यापैकी एकूण रु.७,८०,३२,५४४/- (सात कोटी ऐंशी लाख बत्तीस हजार पाचशे चव्वेचाळीस फक्त) इतकी रक्कम प्रत्यक्षात राज्य मराठी विकास संस्थेस अदा करण्यात आली.
(४) विश्व संमेलनासाठी झालेल्या खर्चापैकी उर्वरित देयके अदा करण्याची कार्यवाही सूरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्या विद्यार्थिंना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराची माहिती दिली जात नसल्याबाबत.**

**(३०) ५९३१३ (२४-०४-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत सर्व शाळांचे लेखापरीक्षण होत नसल्याचे दिसून आल्यानंतर केंद्र शासनाने स्वतंत्र सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती केली असुन गेल्या ५ वर्षांची माहिती भरून देण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६४ % शाळांनीच माहिती भरली असून उर्वरीत शाळांनी माहिती दिली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने का ेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. दिपक केसरकर (२९-०५-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यातील शाळांचे लेखापरिक्षण करण्याकरीता शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन सनदी लेखापाल संस्थेची निवड करण्यात आलेली आहे.
(२) व (३) सद्यस्थितीत राज्यातील सुमारे ७६ टक्के शाळांनी ऑनलाईन माहिती भरली आहे. तसेच, उर्वरित माहिती भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा महामार्गावरील ओसरगाव येथे टोलनाका उभारण्यात आल्याबाबत**

**(३१) ५९३८६ (२५-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गावरील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रस्त्याचे काम प्रलंबित असतांना ओसरगाव येथे टोलनाका उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्गातील नागरीकांना सदर महामार्ग वगळता जिल्हांतर्गत प्रवास करण्यासाठी दुसरा पर्याय नसल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरीकांना टोल माफ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही,
मुंबई गोवा महामार्गावरील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रा. म. क्र. ६६ चे तळगाव ते झाराप चौपदरीकरणाच्या प्रस्तावित कामापैकी ९९.६६ टक्के काम पुर्ण झाले असुन उर्वरीत लांबीचे काम भुसंपादन बाबींमुळे प्रलंबित आहे. रस्ते परिवहन

मंत्रालयाचे टोल नाका उभारणे व टोल सुरु करण्याचे संदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार टोल गोळा करण्याची प्रक्रीया सुरु करण्यांत आलेली आहे.
(२) हे खरे आहे.
स्थानिक रहीवाशी व लोकप्रतिनिधी यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरीकांना टोल माफ करण्याची मागणी होत आहे.
(३) सदर टोल माफी ही धोरणात्मक बाब असून रस्ते परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अखत्यारीत येत असल्याने निर्णयात्मक उपरोक्त कार्यवाही त्यांचेमार्फत होणे अपेक्षीत आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण रेल्वेमार्गावरील हळवल उड्डाणपुलाच्या जोडरस्त्यासाठीच्या भूसंपादनाबाबत**

**(३२) ५९४०५ (२५-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गत ११ वर्षापासून प्रलंबित असलेल्या कोकण रेल्वेमार्गावरील हळवल उड्डाणपुलाच्या जोडरस्त्यासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया माहे जानेवारी, २०२३ मध्ये सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जोडरस्त्याच्या कामास कधीपासून सुरुवात होणार आहे व त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्याचे स्वरुप काय असणार आहे?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) कोकण रेल्वेमार्गावरील हळवल उड्डाणपुलाच्या जोडरस्त्यासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रियेकरीता ऑक्टोबर,२०२१ मध्ये सल्लागाराची नेमणूक करण्यात येऊन भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीत आहे.
(२) भूसंपादनासाठी मंजूर रस्ता आखणीप्रमाणे आखणी निश्चितीसाठीची मोजणी प्रक्रीया करण्यात आली असून त्यानुसार भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे. भूसंपादनाच्या प्रक्रीयेअंती जमीनीची मालकी शासनास प्राप्त झाल्यावर जोडरस्त्याच्या कामास सुरूवात करणे शक्य होणार आहे. त्यासाठी सुमारे रू.३२.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.
(३) भूसंपादन करण्यात येणाऱ्या जमिनीसाठी जमीन मालकास आर्थिक मोबदला देण्यात येणार आहे.

---

**शाळेय विदयार्थ्यांना देण्यात येणा-या पोषण आहाराचा दर्जा ची तपासण्यासाठी तालुका निहाय नियुक्त करण्यात आलेल्या भरारी पथकाने तपासण्या पूणन केल्याबाबत**

**(३३) ५९५१० (२४-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय विदयार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराचा दर्जा घसरल्याच्या तक्रारी वाढल्यामुळे शासनाने दर महिन्याला शाळांना अचानक भेट देऊन तपासणी करण्यासाठी आदेश दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाच्या अनुषंगाने एक जिल्हा व आठ तालुकास्तरीय भरारी पथकांची नियुक्तीही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पथकांने जिल्हयामध्ये ३५ टक्केही तपासण्या केल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पथकाकडून दर महिन्याला किती तपासण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे,त्यानुसार सदर पथकाने आतापर्यत किती तपासण्या पूर्ण केल्या आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२९-०५-२०२३) :**(१) प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता राज्यातील प्रत्येक जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके गठीत करण्याचे निर्देश शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी दिलेले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जिल्हा स्तरावर १ व आठ तालुकास्तरावर ८ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०२३ अखेर उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जिल्हा पथकाने ३९ शाळा व तालुका स्तरावरील भरारी पथकांनी ३२९ शाळा भेटी देवून तपासण्या केल्या आहेत.

(४) जिल्हा स्तरावरील भरारी पथकाने दरमहा किमान दहा शाळांची तपासणी भरारी पथकामार्फत करण्यात यावी, असे निर्देश शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी दिले आहेत.

माहे जानेवारी, २०२३ अखेर जिल्हास्तरावरील भरारी पथकांनी ३,४९६ व तालुकास्तरावरील पथकांनी एकूण १०,४४२ शाळांना भेटी देवून तपासण्या केल्या आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगाव व शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत नवीन लाभार्थी सामाविष्ट करणेबाबत

**(३४) ५९६३५ (२४-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव व शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत नवीन लाभार्थ्यांची नावे समाविष्ट करण्याची मागणी पात्र लाभार्थ्यांनी पुरवठा अधिकारी, तहसीलदार व लोकप्रतिनिधी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने मध्ये पात्र लाभार्थी संख्या सामाविष्ट करुन लक्षांक वाढविण्यासाठी तहसीलदार, खामगाव यांनी अन्न नागरी व पुरवठा विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने प्रलंबित पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट करुन लक्षांक वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत नवीन लाभार्थ्यांची नावे समाविष्ट करण्याची मागणी लाभार्थ्यांनी तहसिल खामगांव व शेगाव कार्यालयाकडे केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

खामगांव तालुक्यात एकुण अर्ज ५४३० प्राप्त झाले होते. त्यापैकी ४४९४ प्राप्त लाभार्थ्याचे अर्ज मंजुर करुन निकाली काढण्यात आलेले आहे. खामगांव तालुक्यात अत्योदय योजनेचा ७० व प्राधान्य कुटुंब योजनेचा ६५०० लक्षांक शिल्लक असुन उर्वरित ९३६ अर्ज (लोकसंख्या ३७४४) अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेश करण्यात येत आहे.

तसेच शेगांव तालुक्यात आजपावेतो ११२८ अर्ज प्राप्त होते त्यापैकी ३०५ प्राप्त लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर करुन निकाली काढण्यात आलेले आहे. अत्योदय योजनेचा ८० व प्राधान्य कुटुंब योजनेचा ३९८३ एवढा लक्षांक शिल्लक असुन उर्वरित ८२३ अर्ज (लोकसंख्या ३२९२) अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेश करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-अहमदनगर दरम्यानच्या माळशेज घाटापर्यंतच्या १७ कि.मी. रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाबाबत**

**(३५) ५९७३९ (२५-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-अहमदनगर आणि पुणे (ता.जुन्नर, जि.पुणे) जिल्ह्याच्या काही भागांना जोडणाऱ्या माळशेज घाटातील १७ कि.मी. रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाचे भूमीपुजन करुनही अद्याप काम सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी केंद्र शासन तथा राज्य शासनातर्फे एकूण किती निधी मंजूर करण्यात आला आहे तसेच सदर रस्त्याच्या बांधकामाच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बांधकामास विलंब करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

सदर काम सन २०२१-२२ मध्ये मंजूर झाले असून नोव्हेंबर २०२२ मध्ये सुरु करण्यात आले होते.

(२) केंद्र शासनाकडून एकूण रु.१३८.०४ कोटी रस्त्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर काम हे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये सुरु करण्यात आले होते. परंतु स्थानिक ग्रामस्थांनी भूसंपादनाचा मोबदला न मिळाल्याने काम बंद पाडले. उप जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधित भूधारक यांचे सोबत पुढील कार्यवाहीकरीता पत्र व्यवहार प्रगतीत आहे. तसेच रस्त्याचे काम सुरु करणेबाबत विभागास सूचना प्राप्त झाल्या आहेत. सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.

एकुण लांबी पैकी ११.६०० कि.मी. करीता वन खात्या अंतर्गत येणा-या जागेसाठी परवानगीचा प्रस्ताव सहाय्यक वनक्षेत्र अधिकारी, मुरबाड यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

---

**राज्य व्यवहार कोषात सामान्यांना कळतील अशा नवीन प्रचलित शब्दांची भर घालून शब्दकोष अद्ययावत करण्यात आलेल्या काम भाषा सल्लागार समितीच्या बैठका घेण्याबाबत**

**(३६) ६०२२० (२५-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कामकाजातील अनेक मराठी शब्दांचे अर्थ सर्वसामान्यांना समजण्यास कठीण ठरत असल्यामुळे राज्य व्यवहार शब्द कोषात कळतील अशा नवीन प्रचलित शब्दांची भर घालून शब्दकोष अद्ययावत करण्याचे काम भाषा सल्लागार समितीकडे सोपविण्यात आले असून मागील ४ महिन्यांत समितीची एकही बैठक न झाल्याने नवीन शब्दांबाबत निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारी कार्यालयांमध्ये मराठी भाषेचाच वापर व्हावा व सरकारी भाषा सर्वसामान्य नागरिकांनाही समजावी यासाठी राज्य व्यवहार शब्दकोषातील क्लिष्ट शब्द सोपे करावेत तसेच कठीण शब्दांना कालानूरुप नवीन प्रचलित शब्द सुचविण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व जेष्ठ साहित्यिक

श्री.लक्ष्मीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ३० जणांची भाषा सल्लगार समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भाषा सल्लागार समितीची मागील ४ महिन्यात एकही बैठक झालेली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भाषा सल्लागार समितीचे पुढील कामकाज सुरळीत सुरु रहावे यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२६-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही. पुर्नरचित मराठी भाषा सल्लागार समितीच्या दिनांक ३ व ४ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीमध्ये शासन व्यवहार कोश सुधारीत उपसमितीने नव्याने समाविष्ट केलेल्या संज्ञांची विभागणी करुन शासन व्यवहार कोशातील क्लिष्ट मराठी पर्यायांचे सुलभीकरण करण्यासाठी समितीतील १० सदस्यांना संज्ञांच्या सुलभीकरणाचे काम सोपविण्यात आले. भाषा सल्लागार समितीच्या सदस्यांकडून सुलभीकरण करण्यात आलेल्या संज्ञांचे मराठी पर्याय विद्यमान कोशात समाविष्ट करण्यात आले आहेत.
(२) महाराष्ट्र राज्याचे साधारणपणे पुढील २५ वर्षाचे मराठी भाषेचे धोरण ठरविणे, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचविणे व यानुषंगाने शासनाला मार्गदर्शन करणे तसेच भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अनेक कोशांमध्ये
नवीन प्रचलित शब्दांची भर घालून कोश अद्ययावत करणे,नवीन परिभाषा कोशांची निर्मिती करणे, परिभाषेतील अत्यावश्यक परिष्करणे, मराठी परिभाषिक संज्ञांच्या समस्या सोडविणे इ. कामे पार पाडण्याकरिता प्रथमत: दि.२२.०६.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये भाषा सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. तद्नंतर वेळोवेळी सदर समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.
शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.३०.१२.२०११ अन्वये श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.
(३) पुनर्रचित भाषा सल्लागार समितीची पहिली बैठक दि.०३ व ०४ फेब्रुवारी २०२३ रोजी, दुसरी बैठक दि.२३.०६.२०२२ रोजी, तिसरी बैठक दि.१२.०४.२०२३ रोजी आणि चौथी बैठक दि. २८.०४.२०२३ रोजी पार पडली आहे.
(४) भाषा सल्लागार समितीचे कामकाज सुरळीतपणे सुरु असून वेळोवेळी बैठका घेऊन मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय सदर समिती घेत आहे.
(५) शासन व्यवहार कोशातील क्लिष्ट मराठी पर्यायांवर मराठी भाषा समितीने उचित कार्यवाही करुन सदर सुलभीकरण केलेल मराठी पर्याय शासन व्यवहार कोशात समाविष्ट करुन ते मुद्रितासाठी पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे याप्रकरणी विलंब झालेला नाही.

---

### पुणे विद्यापीठची कुलगुरू निवडीसाठी स्थापन केलेली निवड समिती अवैध असल्याबाबत

**(३७) ६०५५५ (२५-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीकरिता कुलगुरू शोध समितीमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नामनिर्देशित केलेला एकही सदस्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २०१० आणि त्यानंतर सन २०१८ मध्ये प्राध्यापक, कुलगुरू पदांच्या पात्रता, निवड समित्या, वेतनश्रेणी याबाबत नियमावली प्रसिद्ध केलेली असून २०१८ च्या नियमावलीतील कलम ११ प्रमाणे कुलगुरू शोध समितीमध्ये किमान तीन ते पाच सदस्य आवश्यक असून यापैकी एक सदस्य विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला असावा, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या दरम्यान दिलेल्या एका निकालानुसार महाराष्ट्र शासनास विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या नियमावलीत कोणताही बदल करता येत नसून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे उल्लंघन केल्यास राज्य शासनास करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीसाठी स्थापन झालेल्या शोध समितीमध्ये तीन सदस्य असले तरी त्यातील एकही सदस्य विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला नसल्याने ही समिती अवैध ठरत असून यावर राज्य शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०६-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम २०१८ नुसार सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सूधारणा करण्यात आली असून त्यानुसार कुलगूरू शोध समितीमध्ये, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी सदस्य म्हणून आहे व पुढील कार्यवाही सूरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकोट (जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी शेकडो झाडांची केलेली वृक्षतोड**

**(३८) ६०६२७ (२५-०४-२०२३). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर-अक्कलकोट (जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी खाजगी जमिनीचे संपादन करुन नियमबाह्यरित्या या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या शेकडो वृक्ष तोडण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वृक्षतोडणी संदर्भात महानगरपालिकेने तब्बल चार वर्षानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) राष्ट्रीय महामार्ग क्र.१५० ई अक्कलकोट ते सोलापूर हा रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येतो.
सदर महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी तोडण्यात आलेल्या झाडांच्या संबंधी सक्षम प्राधिकारी म्हणून उपवनसंरक्षक, वनविभाग सोलापूर यांचेकडून कायदेशीर मान्यता प्राप्त करुन त्यांचेकडे नियमाप्रमाणे झाडांची शासकिय मुल्यांकन शुल्क भरुन झाडे तोडण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगुरुनगर ते नाशिक फाटा (भामा आसखेड) दरम्यानच्या चांडोली व मोशी टोलनाक्यास नागरिकांचा होत असलेला विरोध**

**(३९) ६०७५८ (२५-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजगुरुनगर ते नाशिक फाटा या दरम्यानच्या चांडोली व मोशी येथील टोलनाक्यावर सातत्याने होणारी प्रचंड वाहतूक

कोंडीमुळे रस्त्यांची झालेली दुरावस्था व सर्व्हिस रोडकडे केलेलं दुर्लक्ष याबबत अनेक वेळा नोटीसा/समज देऊन देखील राष्ट्रीय महामार्ग व संबधित टोल कंपनीकडून दुर्लक्षच करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांसह महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांदेखील प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय
(२) असल्यास, या दोन्ही टोलनाक्यास वाहनचालक, प्रवाशी, राजकीय पक्ष्याचे लोकप्रतिनिधी, नेते व इतर संघटनांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०५-२०२३) :**(१) राजगुरुनगर ते नाशिक फाटा (भामा आसखेड) हा रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येतो.

राजगुरुनगर ते नाशिक फाटा या दरम्यानच्या लांबीमध्ये रस्ता सुस्थितीत असून क्रॉस रोड जंक्शनवर वाहतुक कोंडी होते.

चांडोली व मोशी या टोल नाक्याच्या ठिकाणी वाहतुक कोंडी होत नाही.

(२), (३) व (४) या टोलनाक्यावर सुरु होणा-या पथकर वसुलीसाठी लोकप्रतिनिधी व स्थानिक लोकांनी विरोध दर्शविला असल्याने सदर ठिकाणी पथकर वसुली सुरु करणेत आलेली नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे ) येथील शिधावाटप कार्यालय ४६ फ च्या अपुऱ्या जागेअभावी निर्माण होत असलेल्या समस्यांबाबत**

**(४०) ६१०११ (२४-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालय ४६ फ च्या अपुऱ्या जागेअभावी निर्माण होत असलेल्या समस्यांसंदर्भात दिनांक २२ फेबुवारी, २०२२ रोजी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्या अध्यक्षते खाली बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने अंबरनाथ पंचायत समिती कार्यालयीन इमारतीच्या मोकळया जागेत शिधावाटप कार्यालय सुरु करणेबाबत तसेच सदर कार्यालयाकरिता पर्यायी जागा उपलब्ध करून घेणेबाबतचे निर्देश मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्देशाच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयाच्या आवारातील मोकळया जागेची पाहणी करुन जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबरनाथ यांनी दि.४.६.२०२१ रोजीच्या अहवालात सदर इमारत धोकादायक असल्याचे नमूद केले असल्याने शिधावाटप कार्यालय क्र.४६/फ, अंबरनाथ, (प.) करिता अन्य पर्यायी जागा भाडेतत्वावर घेण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०५-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) कार्यवाही चालू आहे.

(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (पुणे) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाच्या बांधकामाबाबत

**(४१) ६१२९५ (२५-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यामधील पंचतारांकीत औद्योगिक वसाहती व पुणे येथून विदर्भ मराठवाडयामध्ये जाणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात असून रस्त्यालगत शिरुर येथे विश्रांतीकरिता अनेक महत्वाचे अतिथी विश्रामाकरिता येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्या अस्तित्वात असलेले विश्रामगृह अतिथींना अपुरे पडत असल्याने नवीन विश्रामगृहाचे बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नवीन विश्रागृहाचे बांधकाम होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शिरुर (जि. पुणे) येथील विश्रामग, हाबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चोपडा तालुक्यातील शासकीय विश्रामगृह व निवास्थानांच्या बांधकामाबाबत

**(४२) ६२४३९ (२५-०४-२०२३). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था झाली असून येथील कक्षांची संख्या अपुरी आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चोपडा येथे असलेले शासकीय कर्मचारी निवासस्थानेही मोडकळीस आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय विश्रामगृह परिसरात सुसज्ज असे नवीन शासकीय विश्रामगृह तसेच शासकीय कर्मचारी निवासस्थाने बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :** (१)अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) खरे आहे.

(४) चोपडा येथील विश्रामगृह व निवासस्थानांबाबत निधी. निकष व प्राधान्यक्रमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजनआहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आशियाई विकास बँक अंतर्गत कामे समाविष्ट करुन निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४३) ६२५२४ (३०-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशियाई विकास बँक अंतर्गत कामे समाविष्ट करुन निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जुलै, २०२२ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर कामे ही आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून कार्यान्वित करण्यासाठी आशियाई बँकेच्या निकषानुसार पडताळणी करण्यात येत आहे. सविस्तर पडताळणीनंतर निधीची उपलब्धता, कामाचा प्राधान्यक्रम व शासनाचे धोरण विचारात घेता, यथावकाश सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचोरा येथील न्यायालय इमारतीस संरक्षण भिंत व न्यायाधिश निवासस्थान बांधकामास मंजूरी देण्याबाबत

**(४४) ६२५२६ (३०-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा येथील न्यायालय इमारतीस संरक्षण भिंत व न्यायाधिश निवासस्थान बांधकामास मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२२.९.२०२२ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानिवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील दुय्यम न्यायालयांचे संनियंत्रण मा. उच्च न्यायाल, मुंबई यांचेकडे आहे. न्यायालयाकरिता नवीन इमारत बांधण्याबाबतचे प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त होत असतात. पाचोरा येथील न्यायालय इमारतीस संरक्षण भिंत व न्यायाधिश निवासस्थान बांधकामाचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या विचाराधीन आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यावर आवश्यकत ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) विलंब झालेला नाही.

---

## भाषा संचालनालयाच्या ढिसाळ कारभारामुळे राज्यात विक्रीसाठी एकही संविधानाची प्रत उपलब्ध नसल्याबाबत

**(४५) ६२६२४ (२६-०४-२०२३). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाषा संचालनालयाच्या ढिसाळ कारभारामुळे राज्यात विक्रीसाठी एकही संविधानाची प्रत उपलब्ध नसल्याचे प्रजासत्ताक दिनी म्हणजेच दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संविधानाची प्रत उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत

(३) तसेच सदर प्रत उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२९-०५-२०२३) :** (१) होय, भारतीय संविधानाच्या सातव्या व्दीभाषा (इंग्रजी-मराठी) आवृत्तीच्या पुस्तक स्वरुपातील रु.१०,००० प्रतींची छपाई करण्यात आली होती. शासकीय मुद्रणालयाच्या विक्री केंद्रामधील साठा संपुष्ठात आला आहे. तथापि, सदर प्रत भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहे.

(२) संविधानाचे पुस्तक प्रकाशित करण्याची प्रक्रिया ही त्रिस्तरीय प्रक्रिया आहे. सद्य:स्थितीत संविधानातील नवीन सुधारणा विचारात घेऊन आठवी व्दीभाषा (इंग्रजी/मराठी) आवृत्ती प्रकाशित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रक्रियेस केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार भाषा संचालनालय कार्यालयाकडून भारताच्या संविधानाच्या आठव्या व्दिभाषा आवृत्तीची मुद्रित प्रत भारत सरकारच्या राजभाषा खंडाच्या स्तरावरील तपासणीसाठी व मान्यतेसाठी पाठविण्यात आली आहे. त्यास राजभाषा खंड, नवी दिल्ली यांचेकडून अद्याप मान्यता अप्राप्त आहे.

(३) भारताच्या संविधानाच्या विद्यमान सातव्या व्दिभाषा आवृत्तीच्या ५००० प्रतींचे पुर्नमुद्रीत करुन घेण्याबाबत भाषा संचालनालय स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पाली बाह्यवळण रस्त्याच्या बांधकामास होत असलेला विलंब

**(४६) ६२९५१ (२५-०४-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) शहरात वाहतूक कोंडी होत असल्याने येथील बाह्यवळण मार्गाला (बायपास) मंजुरी मिळाली असून अद्याप कामास सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त बाह्यवळण (बायपास) रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करुन वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२३) :** (१) व (२) पाली बाह्यवळण रस्त्याकरिता भूसंपादन करण्यासाठी रक्कम रुपये १० कोटीचे काम अर्थसंकल्पात मंजूर आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर निधी, निकष व प्राधान्यक्रमानूसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालम (जि.परभणी) शहरात शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम करण्याबाबत

**(४७) ६३१८२ (२५-०४-२०२३). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठशिवणी (ता.पालम, जि.परभणी) येथे नवीन शासकीय विश्रामगृहाची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालम तालुक्यामध्ये अनेक महत्त्वाच्या व्यक्ती, लोकप्रतिनिधींचा व शासकीय अधिकारी शासकीय कामा निमित्त येत असून या तालुक्यात सोईसुविधा नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेठशिवणी (ता.पालम) येथे शासकीय जागेत शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी सचिव (रस्ते), मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद आणि अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांना दि.२२.६.२०२० व दि.२१.९.२०२२ रोजी तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**
(१) पेठशिवनी (ता. पालम, जि. परभणी) येथे नवीन शासकीय विश्रामगृहाची आवश्यक्ता नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) दिनांक २८.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये मा. लोकप्रतिनिधी विश्रामगृहाबाबत मागणी केली आहे.
(४) विश्रमागगृहासाठी जागा उपलब्ध नाही. जागा उपलब्धतेनुसार निधी, निकष व प्राधान्यक्रमास अनुसरुन आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही .

---

**लोणार (जि.बुलढाणा) येथील शासकीय विश्रामगृहातील विद्युतीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४८) ६३६८७ (२५-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) येथील शासकीय विश्रामगृहाच्या नुतनीकरणासाठी सुमारे १ कोटी ७५ लाख रुपये खर्च करण्यात आले असताना विद्युतीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही. लोणार (जि. बुलडाणा) येथील शासकीय विश्रागगृहाच्या विस्तारीकरणाच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. २७.०२.२०२० रोजीच्या शासन निर्णायन्वये रु. २१८.१३ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यात अनुसरुन, त्यावर एकूण रु. १८४.८६ लक्ष इतका खर्च झाला आहे. विद्युतीकरण कामासाठी रु. ६.६२ लक्ष रकमेची निविदा अंतिम करण्यात आली असून, त्यानुसार विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी, (ता. आर्वी, जि. वर्धा) शासकीय तंत्र निकेतन येथे नविन अभियांत्रीकी पदवी (B.E. इंजिनीअरिंग) कॉलेज स्थापन करण्याबाबत**

**(४९) ६३९१३ (२७-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा येथे सन १९८५ पासून शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालय सुरू असून येथे जवळपास ५०० विद्यार्थी दरवर्षी शिक्षण घेतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महाविद्यालयात ८०% विद्यार्थी हे वर्धा जिल्ह्यातील असून सदर शहरापासून १०० कि.मी. च्या जवळपास कोठेही शासकीय अभियांत्रीकी पदवी (B.E. इंजिनीअरिंग) कॉलेज नसल्यामुळे उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बाहेर गावी जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय तंत्र निकेतन आर्वी येथे शासकीय ३ एकर जागा शिल्लक असून त्याठिकाणी नविन शासकीय अभियांत्रीकी पदवी (B.E. इंजिनीअरिंग) कॉलेज उभारु शकते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतीनीधीनी मागणी केल्यानुसार नविन शासकीय अभियांत्रीकी पदवी (B.E. इंजिनीअरिंग) कॉलेज स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०६-२०२३) :** (१). होय,
(२) अंशत: खरे आहे.
आर्वी शहरापासून ५० कि.मी. अंतरावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती तसेच ८० कि.मी. अंतरावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ ही दोन शासकीय महाविद्यालये विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध आहेत.
(३) नाही.
शासकीय तंत्रनिकेतन, आर्वी या संस्थेकरिता आवश्यक विविध बांधकामे संस्थेच्या जागेमध्ये प्रस्तावित आहेत. त्यामुळे या संस्थेच्या परिसरात नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार सलग ३ एकर जागा उपलब्ध नाही.
(४) आर्वी येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अमरावती व यवतमाळ येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा पर्याय उपलब्ध आहे. तसेच वर्धा जिल्ह्यात खाजगी विनाअनुदानित तत्वावर ५ अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू आहेत. या महाविद्यालयातही इच्छुक विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विशेषत्वाने आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती देखील करण्यात येत असते. तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ताही देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र सेवा वेतन नियम १९८१ मधील नियम १०,११,१५,४० नुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर समावेशन करणे व इतर मागण्या मान्य करण्याबाबत**

**(५०) ६४०४६ (२५-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सेवा वेतन नियम १९८१ मधील नियम १०,११,१५,४० नुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर समावेशन करणे व इतर मागण्या मान्य करण्याबाबत सेवानिवृत्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कृती समितीचे सचिव यांनी दिनांक १६/१/२०२३ रोजी लेखी निवेदनाव्दारे मा. महामाहिम राज्यपाल महोदय, मुख्य सचिव, अपर सचिव सा. बां. विभाग, सचिव, इमारती सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दिनांक १.१०.१९९४ पासुन कालबध्द पदोन्नती अंतर्गत पहिला लाभ कनिष्ठ अभियंत्यांची वेतनश्रेणी लागू करणे आणि दिनांक १.१०.२००६ पासून आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ उप अभियंतांची वेतन श्रेणी लागू करणे या मागण्या मान्य न झाल्यास प्रशासनाचा निषेध व्यक्त करण्यासाठी दि. २६.०१.२०२३ रोजी एक दिवसाचे अर्धनग्न उपोषण करणार असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०५-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या सवंर्गात समावेशनाची कार्यवाही परिमंडळस्तरावर करण्यात येत असल्याने

वि.स. १६७ (30)

सेवानिवृत्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कृती समितीच्या मागण्यांच्या अनुषंगाने सर्व मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, सर्व अधीक्षक अभियंता सा.बां. परिमंडळ यांना प्रचलित शासन निर्णयामधील तरतूदींनूसार कार्यवाही करुन कृती समितीस अवगत करण्याबाबत दि. २४.११.२०२२ व दि. ०३.०२.२०२३ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.